# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २८ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शुक्रवार, दि. २९ एप्रिल, २०२२ रोजी सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट या विषयावर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन प्रत्यक्ष व आभासी ह्या दोन्ही पध्दतीने करण्यात आले आहे.

अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयाच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात ही परिषद होणार आहे. या आंतराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धनजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या हस्ते होणार आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे सन्माननीय अतिथी म्हणून आभासी पध्दतीने उपस्थित राहणार आहेत. थायलंडच्या लोकप्रशासन विभागातील डॉ. अरूण चैनीट, अमरावती विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिनेश निचेत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेचे संचालक डॉ. अनिल डोंगरे, विभागप्रमुख डॉ. समीर नारखेडे तर संयोजक डॉ. मधुलिका सोनवणे, सह संयोजन डॉ. रमेश सरदार, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. आर. आर. चव्हाण, डॉ. अतुल बारेकर, डॉ. मिलिंद धनराज, डॉ. यशोदीप पाटील आणि प्रा. हर्षल नेरकर यांचे सहकार्य लाभले.

## बातमी क्र.२

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) शहादा येथील युवारंग युवक महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या विजेत्या स्पर्धक आणि विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मंचावर सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अजय पाटील, मानवविद्या प्रशाळेचे संचालक डॉ. अनिल चिकाटे आणि स्त्री अभ्यास केंद्राच्या विभागप्रमुख प्रा. रत्नमाला बेंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी युवारंग स्पर्धेत यश संपादन करणारे दिशा ढगे (द्वितीय क्रमांक -शास्त्रीय नृत्य), निकिता भोई (द्वितीय क्रमांक -मेहंदी), काजल पाटील (द्वितीय क्रमांक –स्पॉट पेंटीग), साराश सोनार, हरिओम पाटील (द्वितीय क्रमांक–वाद-विवाद स्पर्धा), देवांगीनी मोकाशी (तृतीय क्रमांक–शास्त्रीय गायन), संघ व्यवस्थापक-पोर्णिमा देशमुख, प्रा. हर्षल पाटील यांचा कुलगुरूंच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय अक्षय सपकाळे, बाबासाहेब जाधव, निलेश पाटील, कल्पेश चौधरी, शरद पाटील, जितेंद्र पेंढारकर, योगेश माळी, शरद पाटील, जयेश पाटील, अविनाश सोनवणे, अजय कुवर, समाजकार्य विभागातील डॉ. दीपक सोनवणे, विशाल सपकाळे, डॉ. अर्चना पाटील, डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातील डॉ. विजय घोरपडे, सारांश सोनार, कैलास पाटील, समाधान वाघ, अर्थशास्त्र विभागातील निलेश कोळी, अनिल धनगर,

स्त्री अभ्यास केंद्रातील डॉ. विणा महाजन, इतिहास विभागातील प्रा. विश्वास वळवी, प्रा. कुणाल आधार महाजन, प्रा. दीपक पवार यांचाही सत्कार करण्यात आला. प्रा. हर्षल हिरामण यांचे इंग्रजी भाषेत लिखित “डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार आणि निवडणूक अभ्यास” या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अजय पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर आभार डॉ. उमेश गोगडीया यांनी केले.

## बातमी क्र.३

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नव्या युगातील नवे स्वयंसेवक या राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन २५ एप्रिल पासून करण्यात आलेले आहे. शनिवारी या कार्यशाळेचा समारोप आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांच्या हस्ते या वेबिनारचे उद्धाटन झाले. प्रास्ताविक रा.से.यो.चे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी केले. कोविडच्या काळात रा.से.यो. स्वयंसेवकांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्यात म्हणून त्यांना नव्या युगातील नवे स्वयंसेवक म्हणावे लागेल असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेत रोहन न्यायाधिश यांनी सोशल मिडीयावर मार्गदर्शन केले. याशिवाय पराग मते, ॲड. दिलशाद मुजावर यांनी मार्गदर्शन केले . उद्या २९ एप्रिल रोजी प्रा. मुरलीधर भुतडा मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी समारोप माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत चितोळे हे करणार आहेत. असा अभिनव वेबिनार घेणारे पहिले विद्यापीठ ठरले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी